ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 9 | MAY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

भारतीय अर्थव्यवस्था सुधारणेतील क्रांतीकारी पाऊल –वस्तु व सेवा कर विधेयक

डॉ.राम फुन्ने
प्राचार्य,स्व.नितिन कला व विज्ञान महाविद्यालय,पाथरी.

वस्तु व सेवाकर विधेयकाचा पुर्व इतिहास

भारतामध्ये व्हॅट सन 2005 सालीलागु करण्यात आला.त्यावेळच्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये तत्तकालीन अर्थमंत्री श्री.पी.चिदंबरंम यांनी जी. एस.टी.चा उलेख केला होता. एक असा कायदा ज्याच्यामध्ये सर्वप्रकारचे अप्रत्यक्ष कर समाविष्ट होतील आणि एक सुटसुटीत आणी सोपी कर प्रणाली उधोगांसाठी उपलब्ध असेल.किंबहुना व्हॅट हे जी.एस.टी. च्या दिशेने टाकलेले अजुन एक महत्वाचे पाउल होते.

जीएसटी ही भारतात 1 जुलै 2017 पासुन लागु करण्यात आलेली महत्वपुर्ण अप्रत्यक्ष कर प्रणाली आहे.अशा प्रकसरची कर रचना लागु करण्याचा उदेश म्हणजे भारतीय कर रचनेत अमुलाग्रह सुधारण करणे होय.या व्यवस्थेला शासन व अर्थशास्त्रज्ञांकडुन स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची सर्वात मोठी कर सुधारणा म्हणुन गौरवण्यात आले आहे.या कर व्यवस्थेने केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडुन वस्तुंवर लावण्यात येणारे विवीध कर रद करुन पुर्ण देशासाठी एकच अप्रत्यक्ष कर व्यवस्था लागु करण्यात आलेली आहे.त्यामुळेएक देश,एक कर अशा पध्दतीची अर्थ व्यवस्था भारतात निर्माण झालेली आहे.तसेच संपुर्ण देशाचे एका बाजारपेठेच्या रुपात रुपांतर झालेले आहे.या कर प्रणालीमुळे कर चुकव्याना चाप बसणार असुन राज्य सरकार तसेच सर्वसामान्याना यामुळे त्रास होणार नाही असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे.या कर प्रणालीने सेंटर सेल्स टॅक्स,सेवा कर,एक्साइज टॅक्स,रक्झरी टॅक्स,मनोरंजन कर,व्हॅट सारखे सर्व कर रद होऊन जीएसटी हा एकच कर अस्तीत्वात राहणार आहे.केंद्र आणी राज्य सरकारला यातील समान वाटा मिळणार आहे.या कर व्यवस्थेला लागु करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत 122 वी घटनी दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

जीएसटी कर प्रणाली व्यापाऱ्यांसाठी देखील फायदयाची आहे त्यामुळे व्यवहारात पारदर्शक्ता येणार असुन वेब पोर्टलचा उपयोग करण्यात आल्याने नोंदणी,रिटर्न,कर भरणे या कर सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणार आहेत त्यामुळे व्यापाऱ्यांसाठी ही बाब फायदयाची आहे.कर एक समान असुन इतर गुपीत कर नसल्याने व्यापारात निश्चितता येऊन व्यापार वाढण्यास मदत होईल.कर तटस्थता असल्याने व्यापाराच्या ठिकाणानुसार व्यापाऱ्याना तोटा सहण करावा लागणार नाही.एकच कर दयावा लागत असल्याने स्थानिक निर्मीत वस्तुना लागणाऱ्या कराचे प्रमाण कमी होउन स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन मिळाल्याने निर्यात वाढण्यास देखील मदत होईल.जर जी.एस.टी. कायदा त्याच्या मुख्य उदेशापासुन ढळला नाही तर करबचतीमधुन जास्तीजास्त फायदा करुन घेणारी व्यापारी मनोवृत्ती ही ग्राहकाभीमुख होण्यास मदत होईल.कारण जी.एस.टी. मुळे सर्व भारतात कोठुनही कुठेही मालाची खरेदी विक्रि करण्याच्या निर्णयांमध्ये करप्रणालीचा विचार करायची गरज उरणार नाही.

वस्तु व सेवा कराचे फायदे :.

1.मूल्यवर्धित कर राज्य शासनामार्फत व उत्पादन शुल्क, सेवा कर हे केंद्र शासनामार्फत आकारले जात.सदर कराची आकारणी केंद्र व राज्य शासनामार्फत स्वतंत्रपणे होत असल्याने एका कराची वजावट दुसरा कर भरताना

दिली जात नसे.सबब मालाच्या किंमती वाढत असत.वस्तु व सेवाकर कायदयाने या बाबींचे निराकरण झालेले आहे.

2.या कायदया अगोदर उत्पादीत मालावर केंद्रीय उत्पादन शुल्क लागु होते व त्यावर मूल्य वर्धित कर आकारला जात असे त्यामुळे करावर कराची आकारणी होऊन कराचा बोजा वाढत असे.वस्तू व सेवा कर कायदयामुळे करावरील कर नाहीसा झाला असल्याने एकुण कराचा बोजा कमी होऊन उपभोक्त्यांचा फायदा होणार आहे.

3.केंद्रीय विक्रीकर कायदा अस्तित्वात असताणा या कायदयानुसार आंतरराज्यीय माल विक्रीवर ज्या राज्यातुन माल विक्री झाली त्या राज्यातुन दोन टक्के केंद्रीय विक्री कर लावला जात असे.परंतु ज्या राज्यामध्ये वस्तुंची खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेल्या केंद्रीय विक्री कराची वजावट मिळत नसे.कराची वजावट मिळत नसल्याने कराचा भाग मुळ किमतीत मिळुन किमत वाढत जाई.या बाबीचे निराकरण जीएसटी मुळे होणार आहे.

4.प्रत्येक राज्याचे वस्तुंवरील दर वेगवेगळे असल्याने वस्तुंच्या किमतीत फरक पडत होता व त्यामुळे देशभर एकच करप्रणाली अंगीकृत न झाल्याने संपुर्ण देश एकसंघ बाजारपेठ नव्हता.वस्तु व सेवा कर कायदयामुळे हे शक्य झाले आहे.

5.करदात्याला एकापेक्षा अनेक कायदयाचे पालन करावे लागत असल्याने बराच वेळ व विविध कायदयाच्या तरतुदी लक्षात ठेवाव्या लागत असत तर अनेक कायदयाचे विवरण पत्रके संगणकाद्वारे होत नसल्याने अचुकता कमी प्रमाणात येत होती.वस्तु व सेवा करप्रणालीत सर्वच व्यवहार संगणकामार्फत होणार असल्याने अचुकता येईल व कार्यपुर्ती लवकर होईल.

वस्तु व सेवा कर आणि केंद्र राज्य सबंध :.

१ जुलै २०१७ पुर्वी कोणतेही सामान व सेवांवर केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडुन विविध प्रकारचे कर आकारले जात असत. थोडक्यात घटनेतील अधिकार वाटपाच्या सुचीनुसार कर आकारणी व वाटप होत असे. केंद्र सुचितील विषया संदर्भातील कर आकारणीचा अधिकार केंद्र सरकारला,राज्य सुचीतील विषया संदर्भातील कर वसुल करण्याचा अधिकार राज्य सरकारला अशा प्रकारची कर रचना होती.२००७ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी फेब्रुवारी २००७ मध्ये जीएसटी विधेयक संसदे समोर मांडले होते.परंतु राज्य सरकारच्या असहकारामुळे ते तेव्हा मंजुर होऊ शकले नाही.राज्य सरकार कर आकारणीचा आपला अधिकार सोडण्यास तयार नव्हते.तसेच जीएसटीच्या अमल बजावनीचा अधिकार केंद्र सरकारला असावा की राज्याकडे हा देखील वादाचा मुदा होता.तो वाद नंतरच्या काळात पंतप्रधान मोदी यानी चर्चेच्या माध्यमातुन सोडवला.एकच कर केद्र सरकारने लावायचा आणी तो वाटुन घ्यायचा असा सोपा पर्याय सर्वाना आकर्षक वाटतो,परंतु तसे केल्याने सर्व राज्य केद्राच्या अंकित होतील.ही बाब लक्षात घेऊन केंद्र आणी राज्य दोघांनाही स्वतंत्रपणे कर गोळा करण्याचा अधिकार असेल,अशी व्दिस्थरीय जीएसटी कर योजना सर्वानुमते मान्य करण्यात आली.या योजनेनुसार वस्तु अगर सेवा पुरवठयाच्या सर्व व्यवहारांवर केद्र आणी राज्य दोघेही कर आकारु शकतील आशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.तथापी प्रवेश कर,खरेदी विक्रि,पुनविक्री,मनोरंजन,ऐशआराम यावर कर लावण्याचे राज्याचे अधिकार कमी झालेले आहेत.या कायदयाच्या मसुदयाचे काम सेन्ट्रर बोर्ड ऑफ कस्टम आणी एक्साईज यांच्याकडे सोपवले होते.त्यामुळे कायदयाचा जो मसुदा तयार करण्यात आला,त्यामध्ये उत्पादन शुल्क आणी सेवा कर यातील अनेक तरतुदी थोडयाफार फरकाने आणलेल्या दिसतात.राज्य सरकारी कर्मचाऱ्याना जीएसटीचे प्रशिक्षण देण्याचे कामही एक्साइजकडेच होते.म्हणुन एक्साइजचा वरचष्मा असलेल्या केद्राचा आग्रह होता की,जीएसटी आल्यानंतरही आता ज्यांना सेवाकर लागु होतो त्या करदात्यांवर आणी दीड कोटी पेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्या सर्व करदात्यांवर अमलबजावणीचा अधिकार केंद्राचा राहील.म्हणजेच राज्य सरकारी कर्मचाऱ्याना नगण्य अधिकार राहतील असा प्रस्ताव होता.याचा एकुणच अर्थ सर्व कर वसुल करण्याचा अधिकार केद्राला असेल.केंद्र सरकार राज्यातीलअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्षमतेबदल शंका घेत होते.राज्यातील अधिकाऱ्यांच्या झमतेबदल शंका घेणे हा अधिकाऱ्याचा अहंकार म्हणावा लागेल.अगोदर राज्यातील कर्मचाऱ्यांना विविध अधिकार होते जसे ऑडिट करणे,हिशोब पुस्तके तपासणेखाते निर्धारण करणे,वसुली करणे,रिफंड देणे,छापे टाकने,जप्ती लावणे हे अधिकार नसतील तर पदाला काय किमत अशी भावना राज्यातील कर्मचाऱ्यांत आसणे साहजीक आहे.या मागील काही

वेगळी कारणे देखील आहेत.ती म्हणजे काही अधिकाराना आर्थिक फायदे चिकटलेले असतात ते केंद्राच्या वर्चस्वाने हीरावुन घेतले जानार आहेत,त्यामुळे देखील राज्यातील कर्मचारी बिथरले आहेत.

सरकारचे असे धोरण आहे की शक्यतो सर्व निर्णय एकमताने व्हावेत,परंतु केंद्राच्या अधिकाराचा विषय जेव्हा आला तेव्हा केद्राच्या अधिकारा संबंधीचा प्रस्ताव राज्यानी पुर्णपणे फेटाळुन लावला कारण कर वसुलीत केंद्राचाच वरचष्मा राहणार होता.अखेरीस केंद्राने राज्यापुढे नमते घेऊन असा निर्णय घेतला की,ज्या व्यापाराची उलाढाल दीड कोटीपेक्षा कमी असेल त्या पैकी 90 टक्के करदात्यांची कर आकारणी करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे आणी १० टक्के केंद्रकडे असतील.ज्या व्यापाराची उलाढाल दीड कोटीपेक्षा जास्त असेल,त्यापैकी 50 टक्के करदाते केंद्राकडे व 50 टक्के करदाते राज्य सरकारकडे असतील.त्या बरोबरच आंतरराज्य व्यवहार,आयात निर्यात इत्यादी व्यवहारांना इटिग्रेटड जीएसटी रागु होणार आहे.परंतु समुद्र किनारी असलेल्या राज्यांची मागणी आशा प्रकारची होती की,किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत कर लावण्याचा अधिकार राज्यांना असला पाहीजे. राज्यांची इच्छा लक्षात घेता केंद्र सरकार देखील या बाबतीत सहमत झाले आहे.

केंद्राचा जीएसटी आणी राज्याचा जीएसटी स्वतंत्र असेल अशी या विधेयकात तरतुद आहे. असे असले तरी राज्याच्या महसुलाचे स्त्रोत राज्याकडुन हिरावुन घेतले जानार आहेत.उदाहराणार्थ राज्यातील महापालिकेचा जागतीक कर रद होणार असल्याने त्यांना उत्पन्नाचे साधन राहणार नाही.परीणामी राज्यातील महापालीका भिकारी होतील.विकास कामानां पुरेसा पैसा उपलब्ध होणार नाही.राज्य हे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा भार देखील सहन करु शकणार नाहीत.राज्यांची किमत शुन्य होऊन त्याना केंद्र सरकारच्या मर्जीवर अवलंबुन राहवे रागणार आहे.हा संघराज्य पध्दतीला मोठा धोका आहे. त्यासाठी राज्यतील सरकार किंवा केंद्र सरकारला त्यांच्या उत्पन्नाची वेगळी व्यवस्था करावी रागणार आहे.१४ व्या वित्त आयोगातील एका सदस्याच्या मता नुसार ही कर प्रणाली आशा प्रकारचा खेळ असेल कि,ज्यामध्ये ३७ रेळ्ळाडु असतील आणी त्यात मुख्य भुमिका ही केंद्र सरकारची असणार आहे,परंतु 28 राज्य आणी 7 केंद्रशासीत प्रदेश स्वताःच्या राजकिय लाभासाठी जीएसटी अर्थव्यवस्थेला कधीही उलथुन टाकु शकतात.या व्यवस्थेचा दोष म्हणजे उत्पादक राज्या पेक्षा अनउत्पादक राज्यांच्याच जास्त फायदयाची ही कर रचना आहे.कारण महाराष्ट्र,गुजरात सारख्या उत्पादक राज्यांच्या नफयाचा या राज्याना फुकट लाभ मिळणार आहे.त्यामुळे गुजरातची नाराजी पाहुन केंद्र सरकारणे जीएसटीतुन मिळणाऱ्या हिस्या व्यतीरीक्त एक टक्का जास्त आर्थिक मदत देण्यास सहमती दर्शवली आहे.तसेच राज्याचे होणारे नुकसान भरुन काडण्याची जबाबदारी केंद्र सरकारने स्वताःवर घेतली आहे.त्या नुसार जीएसटीमुळे राज्याचे जे काही नुकसान होणार आहे ते तीन वर्षात 100 टक्के भरुन काडण्याची जबाबदारी केंद्र सरकारने घेतली आहे.त्या नंतर चौथ्या वर्षी 75 टक्के व पाचव्या वर्षी 50 टक्के भरपाई केंद्राचे सरकार केरर अ६ी व्यवस्था करण्यात आेररी आहे.काही राज्याचा अर्थसंकल्प मोठया प्रमाणात डिजेर,पेट्रोल व मदय याबाबीवर लावण्यात येणाऱ्या करावर अवलंबुन असल्याने तुर्तास त्यावर कर लावण्याचा अधिकार राज्यांकडे ठेवलेला आहे.परंतु भविष्यात केंद्र सरकार हे झेत्र देखीलजीएसटीमध्ये आनण्याच्या तयारीत आहे.येथे एक वेगळा मुदा देखील विचारात घेण्याची आवश्यकता आहे.तो म्हणजे ज्या राज्यात उत्पादन हे केवळ स्वतःच्या उपयोगासाठी केले जाते,तिथे बाजार आढळत नाही.आशा प्रदेशामध्येपैशाच्या रुपाने कमी उत्पन्न असते त्या राज्याना जीएसटीमुळे लागु होणारा कर झेपावनार नाही.या बदल उदाहरण म्हणुन नैऋते व उत्तर कडील राज्यकडे पाहता येइल.अशा ठिकाणची काही उत्पन्ने केवळ त्या ठिकाणच्या संस्कृती नुसार केली जातात.थोडक्यात बऱ्याच ठिकाणी या करामुळे प्रतिकुल परीणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

सारांश :.

भारतीय कर सुधारनेतील सर्वोत्म पाऊलम्हणुन जीएसटी या कर सुधारनेकडे पाहिले जात आहे. आंतरराष्ट्रीय स्थरावर देखील अशा प्रकारच्या कर रचनेची इच्छा व्यक्त होत होती की ,भारताने सार्वत्रीक एक कर प्रणालीचा स्विकार करावा जेने करुन इतर राष्ट्रांना भारता सोबत व्यापार करणे सोईचे होईल.बरोबरच देशासाठी देखील एक कर व्यवस्था असने फायदयाचे असते या विचारातुन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नातुन जीएसटी कर प्रणाली अस्तीत्वात आलेली आहे.या कर रचनेने देशात समान बाजाराची निर्मिती करण्याचे कार्य केलेले आहे.ही व्यवस्था व्यापारी व ग्राहकांसाठी देखील फायदयाची असल्याचे तर्क दिले जात आहेत.

पुर्वी कोणत्याही मालाची विक्री झाली की विक्रीकर तर सेवा प्रदान केली तर सेवा कर वा उत्पादन करुन विक्री केली तर प्रथम उत्पादन शुल्क व नंतर विक्रीकर असे कराचे प्रारुप होते.जीएसटी कायदयामुळे आता विक्रीला महत्त्व राहणार नसुन वस्तु व सेवा कर पुरवठा केल्यास लागणार आहे.त्यामुळे वस्तु व सेवा कर केवळ पारंपरिक विक्रीवर अवलंबून राहणार नसून पुरवठ्यावर लागू होणार आहे.पुर्वी उत्पादन व विक्री पश्चात विक्रीच्या आधारे विक्रीकर लागत असे व तो ज्या राज्यात विक्री झाली असेल त्या राज्यात जमा केला जात होता.जीएसटी कायदया अंतर्गत मालाचा वा सेवांचा पुरवठा करुन उपभोग ज्या राज्यात घेतले गेले असेल त्या राज्यात आता वस्तू व सेवा कर आकारला जाणार आहे व हा पुर्वीच्या अप्रत्यक्ष कर कायदे व जीएसटी कायदयातील मुलभूत फरक आहे.

संदर्भ:.

सर्वांसाठी जीएसटी . सतीष शेवाळकर
दैनिक एक्य,06 / 02 / 2018
दैनिक लोकमत,04 / 08 / 2016
https://mygov.in/home/54211/discuss
http://maybolilekh.blogspot.in